# पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी इतिवृत्त

**प्रकल्प प्रवर्तक मेसर्स विठ्ठल कॉर्पोरेशन लिमिटेड, विठ्ठलराव शिंदेनगर, पोस्ट-म्हैसगाव, तालुका-माढा, जिल्हा - सोलापूर, महाराष्ट्र यांच्या प्रस्तावित मळीवर आधारित आसवणी प्रकल्पाची क्षमता ३०.० किलोलिटर प्रतिदिन पासून १००.० किलोलिटर प्रतिदिन विस्तारिकरण संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी बाबतचा इतिवृतांत**

---

**संदर्भ:-** १) भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाच्या अधिसुचना दिनांक १४-०९-२००६ व सुधारित अधिसुचना दिनांक ०१-१२-२००९ अनुसार

२) भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाच्या दिनांक १४-०९-२०२० चे निर्देश

३) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांचे क्रं.बी-२००९१७-एफटीएस-००८२, दिनांक १७-०९-२०२० चे निर्देश

४) पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई ह्यांचे दिनांक ०३-१२-२०१९ चे निर्देश

---

प्रकल्प प्रवर्तक मेसर्स विठ्ठल कॉर्पोरेशन लिमिटेड, विठ्ठलराव शिंदेनगर, पोस्ट-म्हैसगाव, तालुका-माढा, जिल्हा - सोलापूर, महाराष्ट्र यांच्या प्रस्तावित मळीवर आधारित आसवणी प्रकल्पाची क्षमता ३०.० किलोलिटर प्रतिदिन पासून १००.० किलोलिटर प्रतिदिन विस्तारिकरण संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी वार - शुक्रवार, दिनांक ०५ मार्च, २०२१ रोजी दुपारी १२.०० वाजता प्रकल्प स्थानावर आयोजित करण्यात आलेली होती.

भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाच्या अधिसुचना दिनांक १४-०९-२००६ व सुधारित अधिसुचना दिनांक ०१-१२-२००९ अनुसार सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांनी त्यांच्या कार्यालयीन आदेश क्रं. ई-२२ ,व्दारा पत्र क्रं.बीओ/जेडी/डब्लुपीसी/पीएच/बी-२१०२२६-एफटीएस-०१०१ दिनांक २६ फेब्रुवारी, २०२१ अन्वये खालीलप्रमाणे पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी समिती गठित केली:-

१) जिल्हादंडाधिकारी, सोलापूर - **अध्यक्ष**
किंवा त्यांचे प्रतिनिधी
(अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी यांच्यापेक्षा
कमी दर्जाचा नसावा)

२) प्रादेशिक अधिकारी, - **सदस्य**
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, पुणे
(महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,मुंबई यांचे प्रतिनिधी)

३) उप प्रादेशिक अधिकारी, - **समन्वयक**
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,
सोलापूर

श्री प्रशांत भोसले, प्रभारी, उप प्रादेशिक अधिकारी, मप्रनि मंडळ, सोलापूर तथा आयोजक, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की कोविडच्या पार्श्वभूमीमुळे पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली (संदर्भ क्रं. २ वरिलप्रमाणे) व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई (संदर्भ क्रं. ३ वरिलप्रमाणे) दिलेल्या निर्देशांनुसार ही प्रत्यक्ष जनसुनावणी (Physical Public Hearing) आयोजित करण्यात आलेली असून बैठकीच्या सत्रात १०० व्यक्तींना परवानगी देण्यात आलेली असून जर उपस्थितांची संख्या जास्त असल्यास व्यक्तींना पुढील सत्रात बैठकीत संधी देण्यात येईल. सर्व

उपस्थितांना जनसुनावणीत सहभागाची संधि देण्यात येईल असे सांगितले. त्यांनी उपस्थितांना कोविडच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारच्या निर्देशांचे पालन करण्याची सूचना केली. त्यानुसार, प्रत्येक व्यक्तिचे शारीरीक तापमान तपासणे, सॅनिटायझरचा वापर सभागृहात प्रवेश करताना करण्यात आलेला आहे. बैठकीत प्रत्येक व्यक्तीने मुखपट्टी (मास्क) घालणे व दोन व्यक्तींमध्ये सामाजिक अंतर ठेवण्याची सूचना केली.

आयोजक, यांनी पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी समितीच्या अध्यक्षांचे, प्रकल्प प्रवर्तकांचे प्रतिनिधी व उपस्थित असलेल्या स्थानिक जनतेचे स्वागत केले. समितीच्या अध्यक्षांच्या परवानगीने पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी बाबतची प्रस्तावना विषद केली.

आयोजक, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी असे सांगितले की पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांच्या दिनांक १४ सप्टेंबर, २००६ व सुधारित दिनांक १ डिसेंबर, २००९ च्या अधिसूचनेनुसार विशिष्ट

प्रकल्पांना पर्यावरणविषयक अनुमती घेणे बंधनकारक असून त्यापुर्वी पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणी आयोजीत करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे. श्री भोसले यांनी असे सांगितले की महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांना प्रकल्प प्रवर्तक मेसर्स विठ्ठल कॉर्पोरेशन लिमिटेड, विठ्ठलराव शिंदे नगर, पोस्ट-म्हैसगाव, तालुका-माढा, जिल्हा - सोलापूर, महाराष्ट्र यांच्या प्रस्तावित मळीवर आधारित आसवणी प्रकल्पाची क्षमता ३०.० किलोलिटर प्रतिदिन पासून १००.० किलोलिटर प्रतिदिन विस्तारिकरण संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी आयोजित करण्यासाठी अर्ज प्राप्त झाला. सदरहू प्रकल्प घोषित औद्योगिक विभागाच्या परिसराबाहेर कार्यान्वित असून माळढोक पक्षी अभयारण्यापासून ०५ कि.मी. अंतरावर असल्याने प्रकल्प पर्यावरण अधिसूचना २००६ अन्वये संवर्ग अ(५)स मध्ये मोडत असल्याने त्यासाठी जाहिर जनसुनावणी घेणे बंधनकारक आहे.

समन्वयक यांनी असे स्पष्टीकरण दिले की पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणीचा मूळ उद्देश प्रकल्प परिसरातील सामान्य



65

जनतेस प्रकल्पाविषयी व प्रकल्पामुळे होणारे परिणाम व त्याबाबत सामान्य जनतेच्या भावना जाणून घेणे, प्रकल्पात बंधनकारक असणा-या प्रदूषण नियंत्रण संयत्रणेची माहिती सामान्य जनतेस देणे व त्यांनी दिलेल्या सूचनेचा विचार करणे आहे.

प्रकल्प प्रवर्तकांनी केंद्र शासनाच्या पर्यावरण, वने व हवामान बदल विभागास पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल तयार करण्याची परवानगी मागितली व सदरहू विभागाने दिनांक १२-०३-२०१९ रोजी त्यास मान्यता (अटी व शर्ती - Terms of Reference) देण्यात आली.

सदरहू जनसुनावणी ही आज दिनांक ०५-०३-२०२१ रोजी आयोजित करण्यास जिल्हाधिकारी, सोलापूर यांनी मान्यता दिलेली आहे, त्यानुसार पर्यावरण अधिसुचनेनुसार ३० दिवस अगोदर स्थानिक वृतपत्र दैनिक सकाळ व राष्ट्रीय वृत्तपत्र इंडियन एक्सप्रेस या वृत्तपत्रात दिनांक ०५-०२-२०२१ रोजी मराठी व इंग्रजीत पर्यावरण विषयक जाहीर लोकसूनावणी सूचना प्रकाशित करण्यात आलेली होती. त्यात सामान्य जनतेस उपरोक्त प्रकल्पाविषयी काही

आक्षेप, हरकती, सूचना असल्यास त्या लेखी स्वरुपात नोंदविण्याचे आवाहन करण्यात आले होते.

त्याप्रमाणे नियोजित प्रकल्पाविषयीचा पर्यावरण मुल्यांकन आघाताची व कार्यकारी सारांश अहवालाची इंग्रजी व मराठी प्रत शासनाच्या अधिसूचित कार्यालयांमध्ये म्हणजे भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, विभागीय कार्यालय, पश्चिम-मध्य विभाग, न्यू, सेक्रेटरिएट बिल्डिंग, तळमजला, ईस्ट विंग, सिव्हिल लाईन, नागपूर - ४४० ००१, मा. जिल्हादंडाधिकारी कार्यालय, सोलापूर, मा. अप्पर जिल्हादंडाधिकारी कार्यालय, सोलापूर, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सोलापूर, महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, सोलापूर, तहसीलदार, तहसील कार्यालय- माढा, जिल्हा - सोलापूर, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, माळशिरस, तालुका - माळशिरस, जिल्हा - सोलापूर, ग्रामसेवक / सरपंच, ग्रामपंचायत, कार्यालय-, मौजे अकुळगाव, चिंचगाव, तडवळ, म्हैसगाव, वडशिंगे, पापणस, लाहु, तालुका-माढा, जिल्हा-सोलापूर, पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय,

मुंबई, मुख्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई, प्रादेशिक अधिकारी, प्रादेशिक कार्यालय,महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, पुणे, उप प्रादेशिक अधिकारी, उप प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, सोलापूर, व मप्रनि मंडळाच्या संकेत स्थळावर सामान्य जनतेसाठी उपलब्ध करण्यात आलेले होते. आयोजक यांनी असे सांगितले की स्थानिक मप्रनि मंडळ सोलापूर कार्यालयास श्री सांदिपन रेड्डी, तेलंगणा यांची प्रकल्पास पाठिंबा असणारी एक लेखी सूचना प्राप्त झालेली असून संबंधितांना सुनावणीच्या वेळी उपस्थित राहण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत. आयोजक यांनी उपस्थित असलेल्या सर्वांना त्यांचे काही आक्षेप,हरकती, सूचना असल्यास ती संधि देण्यात आलेली असून ते लेखी वा तोंडी स्वरुपात ती देऊ शकतात. श्री भोसले यांनी पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी सुरु करण्याची विनंती मा. अध्यक्षांना केली.

माननीय अध्यक्षांच्या परवानगीने प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी प्रकल्पाविषयी व पर्यावरण व्यवस्थापन योजनेविषयी

सादरीकरण केले. सदरहू प्रकल्प हा झिरो लिक्विड डिस्चार्ज प्रकल्प असून प्रकल्प स्थानापासून ५.० कि.मी. अंतरावर माळढोक अभयारण्य असून त्यामुळे सदरही प्रकल्पाचा पर्यावर अनुमती प्राप्त करण्यासाठी प्रकल्प प्रवर्तकांना केंद्र शासनाची पूर्व परवानगी लागणार आहे.

सादरीकरणानंतर पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना त्यांच्या काही आक्षेप, सूचना नोंदविण्याचे आवाहन केले.

**उपस्थित नागरिकांनी विचारलेले प्रश्न व त्यास प्रकल्प प्रवर्तक / प्रकल्प सल्लागार / पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांना दिलेली उत्तरे याबाबतची माहिती पुढीलप्रमाणे आहे-**

**१) <u>सौ. अर्चना सोमनाथ पोळ, राहणार-म्हैसगाव, तालुका-माढा, जिल्हा-सोलापूर, व्यवसाय - शिक्षिकाः-</u>**

सौ. अर्चना पोळ यांनी सांगितले की मी शिक्षिका आहे. येथे आता प्रकल्पातील उत्पादन व पर्यावरण संरक्षण उपाय

याबाबत माहिती सांगितली. आम्हीही पालकांना मुलांचा अभ्यास कसा घ्यावा याबाबत माहिती देत असतो. प्रकल्प सल्लागार यांनी दिलेली माहिती खरी आहे, कारण आम्ही शाळेतली विद्यार्थ्यांना शैक्षणिक सहलीसाठी या कारखान्यावर घेऊन येत असतो. कारखाना प्रशासनास सहलीसाठी परवानगी मागितली असता टाळाटाळ न करता ती त्वरित देण्यात येते. मुलांना शैक्षणिक सहलीसाठी कंपोस्ट खत दाखविण्यात येते. ब-याच ठिकाणी मळीचे पाणी रस्त्याच्या बाजूला सोडलेले असते. मात्र गावक-यांना अभिमान आहे की हा कारखाना मळीचे पाणी रस्त्याच्या कडेला सोडत नाही. शाळेची सहल घेऊन आल्यानंतर असे दिसून येते की मळीच्या पाण्यापासून ते खत तयार करतात. प्रकल्पापासून गावक-यांनी कोणतीहू त्रास नाही.

सौ. पोळ यांना पुढे सांगितले की येथे प्रकल्पात आल्यावर छान वाटते. मात्र थोडी झाडांची कमतरता वाटते. तरी सादरीकरणात सांगितल्याप्रमाणे झाडे लावण्यात यावीत.

त्यांनी पुढे प्रश्न विचारला की हा प्रकल्प पावसाळ्यातही कार्यान्वित राहणार का?

पर्यावरण सल्लागार यांनी उत्तर देताना मत मांडले की सौ. पोळ यांना अतिशय सुंदर विश्लेषण केलेले आहे. सादरीकरणात सांगितल्याप्रमाणे हा प्रकल्प पूर्ण वर्ष चालू शकतो. सादरीकरणात दाखविल्याप्रमाणे आपण कंपोस्ट यार्ड पाहिले असेल. वरुन पाऊस पडत असताना आम्हांला कंपोस्टींग करता येत नाहित. पण आम्ही जेव्हा इनसिरेशन करण्यास सुरवात करु, त्यावेळी कारखाना ३३० दिवस कार्यान्वित ठेवणार आहोत.

२) **<u>श्री अशोक लक्ष्मण तरंगे, राहणार-पापणस, तालुका-माढा, जिल्हा-सोलापूरः-</u>**

ह्या प्रकल्प विस्तारिकरणामुळ परिसरातील लोकांच्या आरोग्यावर काही परिणाम होणार का? याविषयी माहिती देण्यात यावी.

पर्यावरण सल्लागार यांनी उत्तर दिले की दोन प्रकारची आरोग्य असतात. एक औद्योगिक विश्वातील म्हणजे कारखान्यात काम करणारे व दुसरे कारखान्याबाहेर काम करणारे. आम्ही दोन्ही अभ्यास करत असतो. प्रकल्पात काम करणा-या कामगारास मोठा धोका असतो. केलेल्या अभ्यासानुसार प्रकल्पात काम करणा-या कामगारास मोठ्या प्रमाणात कोणताही आपत्कालिन अपघात झालेला नाही. प्रकल्पाचा पर्यावरण मुल्यांकन अहवाल तयार करताना १० कि..मी. परिघाचा अभ्यास केलेला आहे. कारखाना कार्यान्वित केल्यापासून प्रकल्पाबाहेर कुठलीही आपत्कालिन परिस्थिती झालेली नाही.

३) <u>श्री पाडूरंग जाधव, राहणार-म्हैसगाव, तालुका-माढा, जिल्हा-सोलापूर,</u>

प्रकल्पास खर्च किती येईल?

पर्यावरण सल्लागार यांनी उत्तर दिले की प्रकल्पास अंदाजे ४० कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे.

४) **श्री राजेंद्र गुडेकर, राहणार-वडशिंगे, तालुका-माढा,जिल्हा-सोलापूरः-**

असा प्रकल्प महाराष्ट्रात कुठे आहे?

पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की जर आसावणी प्रकल्पाचा विचार केल्यास महाराष्ट्रातील ७०% साखर कारखान्यात आसवणी प्रकल्प आहे. इन्सिनरेशनचा व विस्तारिकरणाचा विचार केल्यास ब-याच कारखान्यांनी ती योजना राबवविलेली आहे. पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की मी स्वतः पश्चिम महाराष्ट्रातील २७ आसवणी प्रकल्पाचे कामकाज पाहिले आहे. मात्र सदरहू इन्सिनरेशन तंत्रज्ञान प्रकल्प हा सोलापूर जिल्ह्यातील माढा तालुक्यातील पहिला प्रकल्प आहे. सदरही इन्सिनरेशन तंत्रज्ञान अभ्यास करुन अंमलात आणण्यात आलेले असून ते यशस्वी झालेले आहे.

५) **श्री नीतीन शिंदे, सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समितीः-**

श्री नीतीन शिंदे, सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी येथे मत मांडले की स्थानिकांनी जो मुद्दा येथे उपस्थित केला, त्यातून हवेचे प्रदूषण जे होते, त्यावर करणार असलेल्या उपाययोजनांची माहिती हवी आहे. तरी ती विस्तृतपणे सांगण्यात यावी. त्याचप्रमाणे उपस्थित महिला रहिवाशी यांनी स्पेंट वॉशबाबत प्रश्न विचारला होता व पावसाळ्यात आपण स्पेंट वॉश चालविणार काय व स्पेंट वॉशवर आपण काय प्रक्रिया करणार याबाबत उपस्थितांना समजेल अशी माहिती देण्यात यावी. त्यावेळेस प्रश्न विचारण्यास श्री भागवत देशमुख उभे राहिलेले होते. त्यामुळे प्रथम श्री भागवत देशमुख यांच्या प्रश्नास उत्तर देतो असे प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले.

६) **श्री भागवत देशमुख, माजी सरपंच,लाहू ग्रामपंचायत, तालुका-माढा, जिल्हा-सोलापूरः-**

प्रकल्पात स्पेंट वॉशची निर्मिती व त्याचा विनियोग कसा करणार आहात याबाबतची माहिती देण्यात यावी.

प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की दोन्ही प्रश्नांची उत्तरे एकदम देता येतील.

प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की आसवणीतून उत्पन्न होणा-या सांडपाण्यास स्पेंटवॉश म्हणतात. दोन प्रकारच्या सांडपाण्याची निर्मिती होते. एक concentrated असते. त्यास स्पेंट वॉश म्हणतात. दुसरे diluted असते. त्यास स्पेंट लीज असे म्हणतात. दोन्ही वेगवेगळे असते. एक लिटर अल्कोहोल तयार करताना ७-८ लिटर स्पेंट वॉश तयार होतो. १ १/२ - २ लिटर स्पेंट लिज तयार होते. पावसाळ्यातील गढुळ पाण्याच्या रंगासारखा स्पेंट वॉश असतो. मोलॅसिसचा रंग स्पेंट वॉशला येतो. स्पेंट वॉशमध्ये ६८-७०% सेंद्रीय पदार्थ असतात. काही असेंद्रीय पदार्थही असतात. जरी स्पेंट वॉश विषारी नसला, तरी तो तसाच पाण्यात टाकला तर पाण्यातील प्राणवायू शोषून घेतो, त्यामुळे पाण्यातील जलचरांचे आयुष्य हे धोक्यात येते. प्रकल्पात स्पेंट वॉशचे बायो-मिथिनायझेशन करण्यात येणार

आहे. त्यामुळे त्याची दाहकता 60 -70 % कमी होते. साधारण रंग बदलतो तदनंतर सदरील स्पेंटवॉश एमईई (मल्टीपल इफेक्टीव्ह इव्हॅपरेटरमध्ये आटविण्यात येतो. एमईई मधील condensate Water सीपीयुमध्ये शुध्द करुन त्याचा उत्पादन प्रक्रियेत पुनर्वापर करण्यात येतो. तसेच आटविण्यात आलेला स्पेंटवॉश इन्सिनरेशन बॉयलरमध्ये जाळून टाकण्यात येतो. म्हणजे स्पेंट वॉश हा बंधिस्त टाकीतूनच फिरतो. त्यामुळे स्पेंट वॉशचे उद्भासन (Exposure) पर्यावरणास कुठल्याही प्रकारे होत नाही. हानीसुध्दा होत नाही.

आता दुसरा मुद्दा उपस्थित झालेला आहे तो म्हणजे हवेच्या प्रदूषणाचा. स्पेंट वॉश हा जाळण्यात येईल. चिमणीस/स्टॅकला इएसपी (इलेक्ट्रो स्टॅटिक प्रेसिपरेटर) सयंत्रणा कार्यान्वित करण्यात येणार आहे. इएसपी ही ९९.५ ते ९९.८% क्षमतेची सयंत्रणा आहे. त्यामूळे कोणत्याही प्रकारची राख हवेत जाणार नाही. या प्रक्रियेत सल्फर-डाय-

ऑक्साईड तयार होतो. तर त्या मानकांची चिमणी लावण्यात येणार आहे. त्यामुळे त्याचा धोका होणार नाही कारण तो हवेत विरघळला जातो. त्याचप्रमाणे इतर घटकांचा हवेवर परिणाम होणार नाही. स्पेंट वॉश जाळल्याने त्यातून विषारी वायू निघणार नाही. कोणताही वाईट परिणाम/धोका होणार नाही.

७) **<u>श्री हनुमंत गुडेकर, राहणार-वडशिंगे, तालुका-माढा, जिल्हा-सोलापूरः-</u>**

या प्रकल्पास मोलॅसिस व्यतिरिक्त इतर कच्चा माल लागणार आहे काय?

प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी उत्तर दिले की आता तरी तसे नियोजन नाही. येथे मोलॅसिस वापरण्याचे कारण साखर कारखान्यात ते उपलब्ध आहे. यासाठी मका, तांदुळ, ज्वारी अशांपासूनही अल्कोहोल तयार होते. आताच्या संशोधनानुसार ऊसाच्या गवताच्या पात्यापासूनही अल्कोहोल



71

तयार होते. साखर कारखान्यातून बाहेर जे बगॅस पडते, त्यापासूनही अल्कोहोल मिळू शकते. याबाबत संशोधन चालू आहे. सद्या या प्रकल्पात मोलॅसिसव्दारे अल्कोहोल उत्पन्न् करण्यात येईल.

८) <u>श्री बापू जगताप, राहणार-अकुळगाव, तालुका-माढा, जिल्हा-सोलापूरः-</u>

कंपोस्ट खत मिळेल काय?

प्रकल्पातील कंपोस्टींग ही पध्दत बंद होणार आहे. कारण ३३० दिवस आसवणी प्रकल्प हा चालू राहणार असल्याने कंपोस्टींग बंद होणार आहे.

येथे सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी परत उपस्थितांना आवाहन केले की आपल्या काही सूचना, प्रश्न, आक्षेप, टीकाटिप्पणी असल्यास त्या बैठकीत उपस्थित करण्यात याव्यात.

९) <u>श्री चंद्रकांत बोबडे, राहणार-अकुळगाव, तालुका-माढा, जिल्हा-सोलापूरः-</u>

प्रकल्पामुळे स्थानिकांना आवाजाचा त्रास होईल काय?

आसवणी प्रकल्पात आवाज उत्पन्न करणारी सयंत्रणा नसते. प्रकल्पात आवश्यक असणारी डी.जी सेट्स हे सुध्दा आता बंधिस्त असतात. आतासुध्दा कारखाना हा कार्यन्वित आहे. त्याचा आवाज येत नाही. आम्ही परिसरात व कारखान्यात सर्वेषण केलेले आहे. आम्हांला ध्वनि प्रदूषण निर्दशनास आलेले नाही.

१०) **<u>श्री बालाजी पाटील, राहणार - चिंचगाव, तालुका-माढा, जिल्हा-सोलापूर:-</u>**

सदरहू प्रकल्पामुळे १५०-२०० बेरोजगारांना काम मिळणार आहे. त्यामुळे येतील बेकारी कमी होईल. हे चांगले काम आहे.

११) **<u>श्री नीतीन शिंदे, सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती:-</u>**

श्री नीतीन शिंदे, सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी काही प्रश्न उपस्थित केले -

क)पावसाचे पाणी साठवण (रेन वॉटर हार्व्हेस्टिंग) बाबतील नियोजन सादरीकरणात दर्शविले नाही,

ख) वासाचे प्रदूषण (Odour Pollution) आसवणी प्रकल्प सुरु झाल्यावर वासाच्या प्रदूषणाबाबत काहीही उपाययोजना सादरीकरणात दर्शविल्या नाहीत. त्यांचे अंतर्भाव करावा,

ग) घरगुती सांडपाण्यावर प्रक्रिया काय करणार याबाबतचा ऊहापोह करण्यात यावा,

घ) भारत सरकारने १२ मार्च २०१९ टीओआर प्रदान केलेला आहे. त्यात वने व वन्यजीव मुद्द्यांचा समावेश आहे. मात्र पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालात त्याचा काहीही उल्लेख नाही. येथे माळढोक अभयारण्य आहे. ते फारच जवळ आहे. सीना नदीसुध्दा जवळ अंतरावर आहे. तरी पर्यावरण संरक्षणाच्या दृष्टीने आपण विशेष दक्षता घ्यावी.

ड) पर्यावरण समिती समोर, वन, वन्यजीव व माळढोक याबाबतच्या ना हरकत प्रमाणपत्रे, आपण किती जागरुक आहात, त्यासाठी केलेल्या उपाययोजना आपण समितीसमोर मांडाव्यात अशी सूचना केली.

यास पर्यावरण सल्लागार यांनी उत्तर दिले की माळढोक अभयारण्य विभागाबाबत आम्ही एन.बी.एल. कडे अर्ज करण्यात येत आहे. तांत्रिक बाबींमुळे प्रक्रिया थांबविली होती. पावसाचे पाणी साठवणूक बाबत प्रकल्प प्रवर्तकांनी पूर्वी काहीही केलेले नाही हे खरे असले तरी आता रुफ टॉप व हारव्हेस्टींग करुन शेततळे त्वरित करण्यात येईल.

प्रकल्प सल्लागार यांनी सांगितले की वासाचे प्रदूषण हे जेव्हा उघड्यावर वा जास्त साठवण केल्यानंतर होतो. येथे आता बंद टाकी आहे. त्याचप्रमाणे फरमेनटेशनला जास्त दिवस ठेवणार आहे. या सूचनांचा पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालात नोंद घेण्यात येईल.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी येथे सांगितले की आज आपण विठ्ठल कॉर्पोरेशन लिमिटेड यांच्या मोलॅसिसवर आधारित प्रकल्प विस्तारिकरणाच्या जनसुनावणी बैठकीस उपस्थित आहोत. बैठकीतील उपस्थितांच्या भावना पाहिल्यास प्रकल्पास पाठिंबा दिसत आहे. एक-दोघांनी काही सूचना केलेल्या आहेत. तर काहींनी शंका उपस्थित केलेल्या आहेत. सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनीही काही सूचना केल्या. त्या पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालात नोंद घेण्याची अध्यक्ष यांनी सूचना केली.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी येथे सांगीतले की प्रकल्पात वृक्षांची संख्या कमी आहे. ती वाढविण्यात यावी अशी सूचना प्रकल्प प्रवर्तकांना करण्यात आली.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी औद्योगिक सुरक्षा सप्ताह असल्याने प्रकल्प प्रतिनिधींना दोन शब्द बोलण्याची विनंती केली.

प्रकल्प प्रवर्तकांचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. जमदाडे यांनी औद्योगिक सुरक्षितता प्रकल्पात कशी पाळण्यात येत आहे, याबाबत सविस्तर माहिती दिली. त्यांनी प्रकल्पात ऊस जमा करण्यास येणा-या वाहनांना रिफलेक्टर व सार्वजिनक बांधकाम खात्याकडून रस्त्यांवर वाहतुकीबाबत मार्गदर्शनासाठी व चिन्हे लावण्यासाठी प्रकल्पाने केलेल्या प्रयत्नांची माहिती दिली.

१२) **<u>श्री अप्पासाहेब उबाळे, सामजिक कार्यकर्ता, म्हैसगाव, तालुका-माढा, जिल्हा-सोलापूरः-</u>**

आताच प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितल्याप्रमाणे २०० साली बोगदा तयार होऊन पाणी आले. त्याअगोदर नदीकाठच्या गावांना पाणी नव्हते, ऊस नव्हता. भयानक परिस्थिती होती. या रस्त्यावरुन जाताना भिती वाटत असे. २००८ साली हा

कारखाना सुरु झाला. त्यावेळी एक लाख एकर सुध्दा कोणीही जमिन घेत नव्हते. त्यापेक्षा कमी किंमत जमिनीस येत होती. आता ५० लाख एकर जमिनीचा भाव झालेला आहे. आमच्या गावातील म्हणजे चिंचगाव, म्हैसगाव, वडशिंगे येथील स्थानिक व्यवसायात वाढ झालेली आहे. गावातील लोकांना नोक-या मिळाल्या, त्यांचे प्रपंच सुखी झाले. कारखान्यास पाण्याची गरज भासल्यास आमच्यातीलच लोकांचे टँकर घेण्यात येतात. तरी या प्रकल्प विस्तारिकरणास आम्ही सर्व गावकरी पाठिंबा देत आहे.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी औद्योगिक सुरक्षा सप्ताहाबाबत सांगितले की बरेच कारखाने अत्यंत छोट्या अशा सुरक्षेच्या गोष्टींकडे दुर्लक्ष करतात, मग मोठ्या चुका होतात. ट्रॅक्टरला रिफेलक्टर बसविणे प्रसंगी बंधनकारक करावे लागते.

आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की बैठकीत चिंचगाव ग्रामपंचायत, म्हैसगांव

ग्रामपंचायत आणि तडवळे ग्रामपंचायत यांचे प्रकल्प विस्तारिकरणासा पाठिंबा दर्शविल्याचे पत्र प्राप्त झालेली आहेत.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी मत मांडले की बैठकीत अतिशय चांगले मुद्दे मांडण्यात आले, व त्याचे चांगले निरसन प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी केलेले आहे. त्यांनी सांगितले की बैठकीत उपस्थित करण्यात आलेल्या सूचना, आक्षेप यांची नोंद घेण्यात आलेली असून त्याचा इतिवृतात समावेश करण्यात येईल. मराठी व इंग्रजी हया दोन भाषेत इतिवृत तयार करण्यात येईल. सदरहू इतिवृत्ता अंतिम पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालासोबत व प्राप्त लेखी सूचना पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार यांना सादर करण्यात येईल. तेथील तज्ज्ञ समिती याबाबत योग्य तो निर्णय देईल. त्यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानले व बैठकीचे कामकाज संपन्न झाल्याचे घोषित केले,

माननीय अध्यक्षांच्या परवानगीने बैठक ही संसस्गित करण्यात आली.

प्रकल्प विस्तारिकरणास पाठिंबा असलेली 03 पत्रे व 01 सूचनापत्र सोबत जोडलेली आहेत.

| | |
|---|---|
| **(प्रशांत भोसले),** | **(नीतिन शिंदे),** |
| आयोजक, | सदस्य, |
| पर्यावरणविषयक जाहिर | पर्यावरणविषयक जाहिर |
| जनसुनावणी समिती | जनसुनावणी समिती |
| तथा | तथा |
| प्रभारी, उप प्रादेशिक अधिकारी, | प्रभारी प्रादेशिक अधिकारी, |
| मप्रनि मंडळ, सोलापूर | मप्रनि मंडळ, पुणे |

**(भारत वाघमारे),**

**अध्यक्ष**

पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती

तथा

अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी, सोलापूर

जिल्हा- सोलापूर